१६५

# प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

'वनभवन', रामगिरी मार्ग, पोलीस जिमखान्याच्या शेजारी, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
☎ ०७१२-२५५१६७५, २५५६९४४ Fax no. ०७१२-२५५०६७५ Email Id : ccfcon@gmail.com

क्र. कक्ष-१२/जमिन/३/पुणे/प्र.क्र.२३(१०-११)/ 1305 /१०-११
नागपूर : ४४० ००१, दि- 28/3/2011

प्रति,
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक)
पुणे

**विषय** : तत्कालिन उपवनसंरक्षक, पुणे श्री. मंगरुळकर यांच्या मदतीने श्रीमती मधु कपूर यांनी राखीव वनाच्या करत असलेल्या विक्रीबाबत तक्रार

**संदर्भ** : १. शासन, महसूल व वनविभाग पत्र क्र. एस-१०/२००९/२२३२/प्र.क्र.४१२ /फ-३, दिनांक १८/१२/२००९.
२. आपलेकडील पत्र क्र. कक्ष-१/जमीन/प्र.क्र.१३०/१३५०, दिनांक १२/०१/२०११.

संदर्भिय पत्राचे कृपया अवलोकन व्हावे. आपलेकडील पत्र संदर्भ २ चे अनुषंगाने कळविण्यात येते की,

"जुना अभिलेख सर्व्हे नंबर ५९ व ६१ चे नावाने आहे आणि अर्जदाराने दाखल केलेल्या अर्जात गट क्र. १३ व १५ चा उल्लेख आहे. अर्जदाराकडून दाखल केलेल्या दस्ताऐवजांमध्ये गट क्र. १३ व १५ चे मुळ सर्व्हे नंबर ५९ व ६१ होते, असे नमुद नव्हते. आणि सदर माहिती महसूल विभागाकडूनही अप्राप्त होती. म्हणून सदर प्रमाणपत्र देण्यात आले तसेच दिलेल्या सदर प्रमाणपत्रात अर्जदारास वनेत्तर कामाबाबत अनुमती असलेबाबत कुठेही उल्लेख नाही."

आपला सदर युक्तिवाद मान्य करणेसारखा नाही, कारण

(अ) एक अर्जदार फार्म हाऊस बनविण्याकरीता आवश्यक प्रमाणपत्र वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडून का घेत आहे?

(ब) फार्म हाऊस / बंगला बनविण्याचे कामाबाबत अर्जात उल्लेख आहे आणि बंगला बनविणे हे वनेत्तर काम आहे याची जाणीव सर्व वन अधिका-यांना आहेतच.

या दोन्ही बाबींच्या आधारावर जुना रेकॉर्डची सखोल तपासणी केल्यानंतरच प्रमाणपत्र दिले पाहीजे होते, असे या कार्यालयाचे मत आहे.

करीता पुणे वनविभागास गट नंबर १३ व १५ चा जुना सर्व्हे नंबर ५९ व ६१ आहे, हे केव्हा समजले, याबाबत या कार्यालयास अवगत करावे. तसेच याबाबत पुरावादाखल दस्ताऐवज असल्यास त्याच्या प्रती अभिलेखासाठी या कार्यालयास पाठवावा, ही विनंती.

**मुळ प्रत मुख्य वनसंरक्षक (संधारण)**
**यांचेकडुन अनुमोदित**

मुख्य वनसंरक्षक (संधारण)
महाराष्ट्र राज्य, नागपूर **करीता**

प्रतिलिपी : वनसंरक्षक, पुणे वनविभाग, पुणे यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीकरीता अग्रेषित.

**वनसंरक्षक पुणे वनविभाग,पुणे**
**विभाग :-**
**आवक क्र :-** 11-4-11
**दिनांक :-**
**मुख्य लेखापाल.**

**माहिती अधिकारी**
तथा
**मुख्य लेखापाल,**
**पुणे वन विभाग, पुणे.**